**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 298 (CCXCVIII) D
ISSN : 2278-9308
July 2021

# भारतातील स्थलांतराचे सामाजिक परिणाम.

डॉ. आर. व्ही. मोरे
समाजशास्त्र विभागप्रमुख,स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड. जि.वाशिम

**सारांश :–**

स्थलांतर हा माणसाच्या आजवरच्या इतिहासात कायमच महत्वाचा घटक राहिला आहे. आदिम काळापासून आजच्या कोरोना संकटापर्यंत माणसे सतत एका ठिकाणाहून दुस–या ठिकाणी जात राहिली आहेत. कधी संकटापासून दूर जाण्यासाठी तर कधी पोटाची खळगी भरण्यासाठी. या स्थलांतर करणा–या माणसांशी तेथील मुळच्या लोकांसोबत झालेल्या शतकात वाढलेला प्रवासांचा वेग आणि संपर्काची क्रांती यामुळे या स्थलांतराचे नवेनवे पैलू सामोरे येत आहेत. स्थलांतराचे हे गणित समजून घेतल्याशिवाय आपल्याला पुढे जाता येणेच अशक्य आहे. किमान भारताबाबत तरी याचा धोरणात्मक विचार करणे आपल्यासाठी तातडीचे ठरले आहे.

कोरोनाच्या संकटापासून वाचण्यसाठी आणि भविष्यातील आर्थिक मंदीच्या भीतीने आज लक्षावधी लोक मुंबई–दिल्लीसारख्या शहरातून आपल्या मूळ गावाकडे परत जात आहेत. वाहतुकीची तुटपुज्या व्यवस्थेमध्ये होत असलेल्या या स्थलांतराच्या कहाण्यांनी काहींना थेट १९५७ च्या फाळणीच्या वेळी झालेल्या ऐतिहासिक स्थलांतराची आठवण येत आहे. ही सारे माणसे अशी का सैरभेर होताहेत. याचा मुळापासून अभ्यास करणे आजघडीला खूप महत्वाचे ठरले आहे. आजवर सारा गोंधळ होता हे जरी मान्य केले तरी यापुढे तरी स्थलांतरासारख्या माणसाच्या या मूलभूत प्रेरणेचा धोरणकर्त्यांनी गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे.

**प्रस्तावना :–**

एकीकडे कोरानाच्या काळात झालेली स्थलांतरे आपल्या देशातील समालरचनेला आव्हान आणि नवा आकार देतील असे अनेकांचे म्हणणे आहे. मात्र त्याचवेळी दुसरीकडे किनारपट्टीला बसलेलया दोन वादळाच्या तडाख्यानंतरही माणसे नव्या ठिकांणाचा शोध घेवू लागली आहेत. या सा–या पार्श्वभूमीवर स्थलांतर या मुद्यांची व्याप्ती भारतापुर्ती तरी नव्याने समजून घ्यायला हवी त्यासाठी या विषयाचे अभ्यासक आणि राज्यकर्ते– धोरणकर्ते यांच्यात वाद असायला हवा.

स्थलांतर हा मुद्दा समाजातील आर्थिक व्यवस्थेला गतिमानता देणारा आणि समाजातील विविध घटकांना उपजिविकेचे साधन मिळवून देणारा आहे. तरीही त्यामुळे निम्न–अतिनिम्न वर्गातील माणसांना एखाद्या जनावरांप्रमाणे शोषण आणि अन्याय सहन करावा लागणे, ही देखील स्थलांतराची महत्वाची बाजू आहे. आजवर ही बाजू व्यवस्थेकडून नेहमीच दुर्लक्षित राहीली आहे.

कोरोनाच्या काळात झालेली स्थलांतरे आणि त्या स्थलांतरप्रक्रियेत झालेल्या कामगारवर्गाच्या व त्यांच्या लेकराबांळाना भोगाव्या लागलेल्या हालअपेष्टा या वास्तवाला अधिक गडद करून गेल्या. या सा–यातून धडा घेवून काही ठोस योजना आखणे आवश्यक आहे. त्यासाठी नागरिक–कामगारवर्ग स्थलांरित समूह आणि शिकून चांगली नोकरी करण्याचे स्वप्न पाहणारा युवावर्ग यांच्याशी संवाद साधणारी संवादकेंद्रे, समुपदेशन संस्था यांची तातडीने गरज आहे. यासोबतच अनौपचारीक नागरी अर्थव्यवस्थाना चालते ठेवणारी अनौपचारीक क्षेत्रे व उपजिविकेचे उद्योग यांच्याकडे वळलेल्या निम्नमध्यमवर्गाच्या दृष्टीने काही परिणामकारक धोरणे राबविण्याची गरजदेखील आता अधिकाधिक अधोरेखित होवू लागणार आहे.

**स्थलांतराची व्याख्या :–**

१. **एस. सी दुबे :–** स्थलांतरण ही सामाजिक परिवर्तनाची अशी प्रकिया आहे की ज्याव्दारे लोकसंख्येची वृध्दी किंवा घट होवू शकते.

२. **बर्गेल :–** व्यक्तीचे एका ठिकाणाहून दुस–या ठिकाणी जाणे म्हणजे स्थलांतरण होय.

एप्रिल २०२० पासून ७.१ टक्के पर्यटक, विद्यार्थी, व्यवसायाच्या उद्देशाने इतर देशांमधून भारतात स्थलांतरीत झाले.

**स्थलांतरणाची कारणे :—**

१. लॉकडाउन
२. नोकरीसाठी
३. कामासाठी
४. शिक्षणासाठी
५. व्यवसायासाठी
६.शहराचे आकर्षण

वरील संपूर्ण कारणांमुळे स्थलांतरणाची प्रकिया घडून आल्याचे दिसून येते. पण त्यापैकी महत्वाचा कारण म्हणजे लॉकडाउन मुळे परदेशात असलेले भारतीय नागरिक हे भारतात परतले. तसेच काही व्यवसाय करण्याच्या उद्देशाने आणि काही लोक शिक्षण घेण्यासाठी गेले या सर्वांनी कोरोना मुळे भारतात स्थलांतर केले.

**स्थलांतरण करतांना निर्माण झालेल्या समस्या :—**

**१. रोजगाराची समस्या :—**

रोजगाराच्या शोधात मुळ गाव सोडून शहरात गेलेले, आपला राज्य सोडून परराज्यात गेलेले तसेच आपला देश सोडून इतर देशात रोजगाराच्या शोधात गेलेल्या सर्व नागरिकांचे रोजगार हे केवळ एका स्थलांतरणामुळे बुडाले. लाखोंच्या संख्येने स्थलांतर करणारे कामगार हे कोरोना मुळे आपल्या घरी परतले. व त्यांच्या कंपन्या अथवा इतर दप्तर ऑफिस ही सगळी बंद पडल्यामुळे त्यांना मुळ गावी परतणे याशिवाय पर्याय उरला नव्हता. त्यामुळे असंख्य कामगार वर्ग, नोकरदार वर्गाने स्थलांतरण केले त्यामुळे रोजगाराची समस्या निर्माण झाली.

**२. मानसिक त्रास :—**

टाळेबंदी किंवा घरीच राहण्याच्या आदेशाचे पालन करतांना सर्वसाधारण दिनक्रमात व्यत्यय आल्याने लोकांच्या मानसिक आरोग्यावर लक्षणीय परिणाम झाला आहे. मुले आणि विद्यार्थी पौढ आणि वृध्द, महिला, तृतीयपंथी समुदाय, आरोग्य सेवा व्यवसायिक आणि अत्यावश्यक सेवा प्रदाते, आर्थिकदृष्टया असुरक्षित गट, शोकग्रस्त कुटूंबे आणि अपंग व्यक्ती आणि मानसिक आरोग्याच्या पूर्व समस्याग्रस्त व्यक्ती अशा कित्येकांच्या मनावर कोविड — १९ चा बराच प्रभाव पडला आहे.

**३. खाण्या—पिण्याचे प्रश्न :—**

कोरोनाचा फैलाव रोखण्यासाठी देशात लॉकडाउन घोषित करण्यात आले. परंतू लॉकडाउनमुळे लोक कामगार विद्यार्थी घरापासून दूर अडकले होते. पैसे नसल्यामुळे अनेकांचे खाण्याचे प्रश्न निर्माण झाले आहे. अशाच वेळेत ज्यांचे अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर घरी येण्याच्या तयारीत असलेले विद्यार्थी तसेच काही कामगारांचे पैसे संपले त्यामुळे काही लोकांना पायदळ घर गाठावे लागले. अशा परिस्थितीत त्यांना रस्त्यांनी येतांना प्यायला पाणी सुध्दा मिळाले नाही. तर काहींना घरी येता — येताच मृत्यूमुखी पडावे लागले.

**४. लॉकडाउनची समस्या :—**

भारतासाठी कोरोना ची समस्या अधिकाधिक गुतांगुंतीची होत चालली आहे. ती केवळ आरोग्याची समस्या राहिली नसून लॉकडाउनमुळे ती आर्थिक, सामाजिक आणि काही ठिकाणी मानसिक समस्या झालेली आहे. भूक आणि कोरोना यांच्या कैचीत भारत आणि महाराष्ट्र सापडला आहे. देशातील ४० टक्के लोक हे एकतर दारिद्रयरेषेखालील आहेत वा रोजंदारीवर पोट भरणारे आहेत. असंघटीत क्षेत्रात काम करणा—यांची संख्या प्रचंड म्हणावी अशी आहे. लॉकडाउननंतर स्थलांतरतांचे लोढें निघाले त्यातील कित्येकजन अजून शहरांमध्ये अडकलेले आहेत. शहरातील मध्यमवर्गाचा प्रश्न भाजी, धान्य यांचा असला तरी तो तितकाच गंभीर नाही पण रोजंदारीवर काम करणा—यांची समस्या ही रोजच्या कमाईचा आहे. दीड महिना कमाई न झाल्याने कित्येक कुटूंबे कोलमडून पडू शकतात. पुढील काही दिवसांनी सगळे ठीक होईल या आशेने कर्जाउ पैसे घेतले, तर अनेकांनी लोकांना मदतदेखील केली. अशी मदत पुढचे काही दिवस सुरू राहिल का यांची

शंका त्यांच्या मनात होती. गरिबांना पैशाची मदत सरकार तरी किती करणार लॉकडाउनमुळे ४० हजार कोटींचा महसुल बुडाला. अशा अनेक समस्या लॉकडाउनमुळे निर्माण झालया.

**५. दळण — वळणाची समस्या :–**

कोरोनाच्या कालावधी मध्ये बाहेर गावी अडकलेले कामगार, विद्यार्थी, पर्यटक यांना पाहिजे त्या प्रमाणात दळण वळणाच्या सोयी उपलब्ध करून देता आल्या नाही. तसेच काही कामगारांना आपल्या घरी जाण्यासाठी वाहनांचा सुध्दा तुटवडा पडला अभावी त्यांना पायदळ घर गाठावे लागले. अशा स्थितीत काही कामगार मृत्यूमुखी सुध्दा पडले. कारण त्यांना रस्त्याने घरी जातांना कोणत्याही सुविधा उपलब्ध झाल्या नाहित. खाण्यापिण्याच्या सुविधा भेटल्या नाहीत. अशा स्थितीत त्यांना उपासी पोटी घरी जावे लागले.

**उपाययोजना :–**

**१.आर्थिक सहकार्य :–**

सरकारने कामगारांना तसेच ज्यांचे हातावर पोट आहेत अश्या सर्व गोर–गरीब, उस कामगार, सिनेमा क्षेत्रात काम करणारे कामगार, पार्सल पोहचविणारे, आर्थिक दृष्टया दुर्बल, दिन दुबळया तसेच दारिद्रय रेषेखालील लोकांना आर्थिक सहकार्य करायला हवे. ज्या सहकार्याने ते स्वत:ची पोटाची खळगी दुर करू शकेल. तसेच दुष्काळग्रस्तांना आर्थिक मदत द्यावी. जेणेकरून ते आत्महत्या सारख्या गोष्टी आपल्या मनात आणू शकणार नाही . त्याच्या कुटूंबातील लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करू शकतील. असे सहकार्य करणे गरजेचे आहे. ते ज्या ठिकाणी आहेत त्याच ठिकाणी जर त्यांना आर्थिक सहकार्य मिळाले तर होणारे स्थलांतरण हे थांबवता येईल.

**२. खाण्यापिण्याच्या सोयी सुविधा पुरविणे :–**

कामगार वर्गाना जर खाण्या–पिण्याच्या सोयी सुविधा मिळाल्या तर एकाच ठिकाणी कितीही कालावधी साठी थाबू शकतील. आज देशात ब–याच ठिकाणी अजूनही लॉकडाउन आहे. त्यामुळे छोटी छोटी हॉटेल्स खाद्य पदार्थाच्या गाडया, छोटया टप–या नाहीत. त्यामुळे पायी किंवा बस किंवा ट्रेन ने निघालेल्या प्रवाशांना वाटेत काही खायला मिळू शकेल ही शक्यता आहे. या सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

**३. निवा–यांची व्यवस्था :–**

मजूर कामगार आणि कष्टकरी वर्गावर तर सगळया देशाची भिस्त आहे. असे असले तरीही त्यांच्यासाठी कोरोनाच्या संकटकाळी व्यवस्थित अर्थसहाय त्यांच्या अन्न, वस्त्र आणि रस्त्याने पायी येतांना त्यांना राहण्याची सोय नव्हती हे खरे तर प्रामुख्याने आणि तातडीने व्हायला हवे होते. पण सरकारने मात्र प्राधान्य वेगळया गोष्टींना दिले त्यामुळे आपल्याच देशातील दुर्बल घटकांवर अशी भयावह आणि माणुसकीला काळीमा फासणारी परिस्थिती ओढावली. मुळात समता आणि न्याय या हक्कांची गल्लत होता नये.

**४. लघुउद्योगांना चालना देणे :–**

कोरोना संकटकाळात लघु उद्योगांना जबर फटका बसला आहे. हे सेक्टर भारतात सगळयात जास्त म्हणजे १२ कोटीहून अधिक लोकांना रोजगार पुरवू शकतो. मात्र या क्षेत्राची अवस्था फार चांगली नाही. याचे महत्वाचे कारण म्हणजे सरकारने या क्षेत्रांकडे विशेष लक्ष दिले नाही. नविन योजना आणल्या नाहीत आणि सुधारणाही केल्या नाहित त्यामुळे हे क्षेत्र म्हणावे तसे सक्षम राहिले. नाही त्यात आता कोरोनांचे भीषण संकट उभे राहिले आहे. मजूर कामगार यांच्या हालअपेष्टा कमी करण्यासाठी किंवा दूर करण्यासाठी सरकारने उपाय योजना करणे आवश्यक आहे. तेव्हाच कुठे हे स्थलांतर थांबविण्यास सहकार्य होईल.

**निष्कर्ष :–**

कोरोनाच्या काळात झालेली स्थलांतरे आणि त्या स्थलांतर प्रकियेत झालेल्या कामगारवर्गाच्या व त्यांच्या लेकरांबाळांना भोगाव्या हालअपेष्टा या वास्तवाला अधिक गडद करून गेल्या या सा–यांतून धडा घेवून काही ठोस योजना आखणे आवश्यक आहे. त्यासाठी नागरिक,कामगारवर्ग,स्थलांतरीत समूह आणि शिकून चांगली नोकरी करण्याचे स्वप्न पाहणारा युवावर्ग यांच्याशी संवाद साधणारी संवादकेंद्रे, समुपदेशन संस्था यांची तातडीने गरज आहे. यासोबतच अनौपचारीक नागरी अर्थव्यवस्थांना चालते ठेवणारी अनौपचारीक क्षेत्रे व उपजिविकेचे उद्योग यांच्याकडे वळलेल्या

निम्नमध्यमवर्गाच्या दृष्टीने काही परिणमकारक धोरणे राबविण्याची गरजदेखील आता अधिकाधिक अधोरेखित होवू लागली आहे. कोरोनाच्या भितीमुळे कामगार शहरांमधून गावाकडे गेले आहेत. त्याचवेळी शहरांमध्ये केवळ कोरोनच नव्हे तर इतरही उग्र समस्या आहेत. शहरात परतल्यावर पूर्वीचे काम मिळेल याची हि श्रमिकांना खात्री नाही.

सदर्भग्रंथ :–

१. डॉ. कुलकर्णी अल्का :– स्थलांतर, विश्वकर्मा प्रकाशन.
२. घोटोळे विवेक :– टाळेबंदीतील उलटे स्थलांतर आणि महाराष्ट्र्याच्या विकासापुढील आव्हाने, द युनिक फाउन्डेशन.
३. वाघमारे दिनानाथ :– लॉकडाउन आणि स्थलांतरीत मजूर आणि भटक्या जमाती, संघर्ष वाहीनी नागपुर
४. देशमुख शेखर :– सक्तीचे मानवी स्थलांतर : अटळ संघर्ष, साधना साप्ताहिक. २२ डिसेंबर २०१०
५. हजारिका संजय :– स्थलांतर कुणीकडून कुणीकडे, चिनार पब्लिशर.

IQAC
Co-ordinator
Late Pushpadevi Patil Arts & Science
College, Risod Dist.Washim-444506

Late Pushpadevi Patil Art's & Sci.College 722 Dist-Washim Risod

Principal
Late Pushpadevi Patil Arts & Science
College Risod Dist-Washim